RNI No. MAHBIL/2009/31733

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण भाग चार—अ

वर्ष ७, अंक २२]　　मंगळवार, मार्च ९, २०२१/फाल्गुन १८, शके १९४२　　[पृष्ठे ४, किंमत : रुपये १५.००

### असाधारण क्रमांक ३६

### प्राधिकृत प्रकाशन

**महाराष्ट्र शासनाने केंद्रीय अधिनियमांन्वये तयार केलेले**
**(भाग एक, एक-अ आणि एक-ल यांमध्ये प्रसिद्ध केलेले नियम व आदेश यांव्यतिरिक्त) नियम व आदेश.**

**वित्त विभाग**

मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक, मंत्रालय,
मुंबई ४०० ०३२ दिनांक १ मार्च २०२१

**अधिसूचना**

**भारताचे संविधान.**

क्रमांक विकनि-१०१२/प्र. क्र. १४०/वि.प्र.२.—भारताच्या संविधानाच्या अनुच्छेद ३०९ च्या परंतुकान्वये प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करून आणि या बाबतीत केलेले सर्व विद्यमान नियम, आदेश किंवा संलेख यांचे अधिक्रमण करून, महाराष्ट्राचे राज्यपाल, याद्वारे, महाराष्ट्र शासनाच्या वित्त विभागाच्या प्रशासकीय नियंत्रणाखाली असलेल्या वस्तू व सेवाकर विभागामधील राज्यकर निरीक्षक, गट-ब (अराजपत्रित) या पदाचे सेवाप्रवेश विनियमित करणारे पुढील नियम करीत आहेत :—

१. या नियमांना, राज्यकर निरीक्षक, अराजपत्रित गट-“ब” (सेवाप्रवेश) नियम, २०२१ असे म्हणावे.

२. या नियमांत, संदर्भानुसार दुसरा अर्थ अपेक्षित नसेल तर—

(अ) “आयोग” याचा अर्थ, महाराष्ट्र लोकसेवा आयोग ;

(ब) “पदवी” याचा अर्थ, सांविधिक विद्यापीठाची पदवी, असा आहे ;

(क) “विभागीय परीक्षा” याचा अर्थ, मंत्रालयीन विक्रीकर विभाग भरतीपश्चात एकिकृत विभागीय परीक्षा नियम, १९७२ यांमध्ये नमूद केलेली विभागीय परीक्षा, असा आहे;

(ड) “शासन” याचा अर्थ, महाराष्ट्र शासन, असा आहे ;

(इ) “वस्तू व सेवा कर विभाग” याचा अर्थ, महाराष्ट्र शासनाच्या वित्त विभागाच्या प्रशासकीय नियंत्रणाखाली असलेला वस्तू व सेवा कर विभाग, असा आहे ;

(फ) “कर-सहायक” किंवा “लिपिक-टंकलेखक” याचा अर्थ, महाराष्ट्र शासनाच्या वस्तू व सेवा कर विभागात कार्यरत असलेला कर सहायक किंवा लिपिक टंकलेखक, असा आहे ;

३. वस्तू व सेवाकर विभागातील “राज्यकर निरीक्षक” या पदावरील नियुक्ती ही एकतर:—

(अ) व्यक्तीच्या पदोन्नतीद्वारे,—

(१) जी व्यक्ती “कर सहायक” किंवा “लिपिक-टंकलेखक” हे पद धारण करीत असेल आणि त्या पदावर तीन वर्षांपेक्षा कमी नसेल इतकी तिची नियमित सेवा झाली असेल त्या व्यक्तींमधून योग्यतेच्या अधिनतेने सेवाज्येष्ठतेच्या आधारे; आणि

(२) जी व्यक्ती, कर सहायकाकरिता किंवा यथास्थिती, लिपिक-टंकलेखकाकरिता विहित केलेली विभागीय परीक्षा उर्तीर्ण झाली असेल ; आणि

(३) जी व्यक्ती वस्तू व सेवाकर विभागातील राज्यकर निरीक्षकासाठी विहित केलेली भाग-एक विभागीय परीक्षा उत्तीर्ण झाली असेल,—

अशा व्यक्तीस पदोन्नती देऊन करण्यात येईल ; किंवा

(ब) शासनाने या बाबतीत आयोगाशी विचारविनिमय करून वेळोवेळी काढलेल्या आदेशानुसार विभागीय स्पर्धा परीक्षेच्या निकालाच्या आधारावर आयोगाने तयार केलेल्या गुणवत्ता यादीच्या आधारे निवड करून करण्यात येईल; किंवा

(क) जे उमेदवार—

(१) एकोणीस वर्षांपेक्षा कमी वयाचे नसतील आणि अडतीस वर्षांपेक्षा अधिक वयाचे नसतील परंतु, मागासवर्गीय उमेदवारांच्या बाबतीत उच्च वयोमर्यादा पाच वर्षांपर्यंत शिथिल करता येईल ;

परंतु, आणखी असे की, शासन सेवेत यापूर्वीच कार्यरत असलेल्या उमेदवारांच्या बाबतीत

उच्च वयोमर्यादा पाच वर्षापर्यंत शिथिल करता येईल; आणि

(२) पदवी धारण करीत असतील.

४. वस्तू व सेवा कर विभागातील राज्यकर निरीक्षक पदावरील नियुक्त्या ह्या पदोन्नतीने, विभागीय स्पर्धा परीक्षेच्या आधारे निवडीने आणि नामनिर्देशनाने ४० (३७%कर सहायक संवर्गामधून आणि ३% लिपिक-टंकलेखक संवर्गामधून) : १० : ५० या प्रमाणात करण्यात येतील.

परंतु, पदोन्नती, निवड व नामनिर्देशन कोट्यातील गुणोत्तर हे, नियुक्ती प्राधिकाऱ्यास, शासन मान्यतेने शिथिल करता येईल.

परंतु, जर निवडीने नियुक्तीसाठी मर्यादित विभागीय परीक्षेसाठी पात्र उमेदवार उपलब्ध नसतील तर ती पदे पदोन्नतीने भरता येतील.

५. नियम ३ मध्ये नमूद केलेल्या पदासाठी नामनिर्देशनाने नियुक्त केलेली व्यक्ती, दोन वर्षांच्या कालावधीसाठी परिवीक्षाधीन असेल. परिवीक्षा कालावधी एका वर्षांपर्यंत वाढविता येईल. जर परिवीक्षा कालावधी समाधानकारकरित्या पूर्ण करण्यात आला नसेल तर मात्र, अशी व्यक्ती सेवा समाप्त केली जाण्यास पात्र असेल.

६. नियम ३ मध्ये नमूद केलेल्या नामनिर्देशनाने नियुक्त झालेल्या व्यक्तीने, शासनाने विहित केलेली बंधपत्रे निष्पादित करणे आवश्यक असेल. जर परिवीक्षा कालावधी समाप्त होण्यापूर्वी उमेदवाराने राज्यकर निरीक्षक पदाचा राजीनामा दिला असेल किंवा वस्तू व सेवाकर विभागाने त्याला कार्यमुक्त केले असेल, तर, संबंधित कर्मचाऱ्याचे एका महिन्याचे मूळ वेतन अशा उमेदवाराकडून वसूल करण्यात येईल.

७. नियम ३ मध्ये नमूद केलेल्या नामनिर्देशनाने नियुक्त झालेल्या व्यक्तीला, मंत्रालयीन विक्रीकर विभाग भरतीपश्चात एकिकृत विभागीय परीक्षा नियम, १९७२ च्या नियम ४(अ) अनुसार विभागीय परीक्षा, ३ वर्षांत किंवा ३ प्रयत्नांमध्ये, यापैकी जे अगोदर असेल तेव्हा, जर उक्त व्यक्तीने अगोदर उक्त परीक्षा उत्तीर्ण केली नसेल किंवा ती उत्तीर्ण होण्यापासून तिला सूट मिळाली नसेल तर, उत्तीर्ण करावी लागेल.

८. नियम ३ मध्ये नमूद केलेल्या पदावर नामनिर्देशनाने नियुक्त केलेली व्यक्ती, हिंदी व मराठी भाषा परीक्षांविषयी केलेल्या नियमांनुसार, जर या अगोदरच या परीक्षा उत्तीर्ण झाली नसेल किंवा तिला या परीक्षा उर्तीर्ण होण्यातून सूट देण्यात आली नसेल तर, तिने या परीक्षा उत्तीर्ण होणे आवश्यक आहे.

९. नियम ३ मध्ये नमूद केलेल्या पदावर नामनिर्देशनाने नियुक्त केलेली व्यक्ती, माहिती व तंत्रज्ञान संचालनालय, महाराष्ट्र शासन यांनी वेळोवेळी विहित केलेले संगणक हाताळणीबाबातचे प्रमाणपत्र धारण करील.

१०. नियम ३ मध्ये नमूद केलेल्या पदावर नामनिर्देशनाव्दारे नियुक्त केलेली व्यक्ती, शासनाने विनिर्दिष्ट केले असेल त्याप्रमाणे असे प्रशिक्षण घेईल.

११. नियम ३ मध्ये नमूद केलेल्या पदावर नियुक्त केलेली व्यक्ती, महाराष्ट्र राज्यात कोठेही बदलीसाठी पात्र असेल.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**विजय द. शिंदे,**

शासनाचे उप सचिव.

## FINANCE DEPARTMENT

Madam Cama Road, Hutatma Rajguru Chowk,
Mantralaya, Mumbai 400 032 dated 1st March 2021

*NOTIFICATION*

CONSTITUTION OF INDIA.

No. Vikani 1012/C.R.No.140/Vipra 2.—In exercise of the powers conferred by the proviso to article 309 of the constitution of India and in supersession of all existing rules, orders or instruments made in this behalf, the Governor of Maharashtra is hereby pleased to make the following rules regulating recruitment to the post of State Tax Inspector, Group -'B' Non-gazetted in the Goods and Services Tax Department under the administrative control of the Finance Department of the Government of Maharashtra namely :—

**1.** These rules may be called the State Tax Inspector, Non-gazetted Group- 'B' (Recruitment) Rules, 2021.

**2.** In these rules, unless the context requires otherwise—

(*a*) "Commission" means the Maharashtra Public Service Commission ;

(*b*) "Degree" means a degree of a statutory University ;

(*c*) "Departmental Examination" means the Departmental Examination mentioned in the Unified Post Recruitment Ministerial Sales Tax Department examinations Rules, 1972 ;

(*d*) "Government" means the Government of Maharashtra ;

(*e*) "Goods and Services Tax Department" means the Goods and Services Tax Department under the administrative control of the Finance Department of Government of Maharashtra.

(*f*) "Tax Assistant" or "Clerk-Typist" means, Tax Assistant or Clerk-Typist working in the Goods and Services Tax Department of Government of Maharashtra.

**3.** An appointment to the post of State Tax Inspector in the Goods and Services Tax Department shall be made either,-

(*a*) by promotion of a person,—

(*i*) on the basis of seniority subject to fitness from amongst the persons holding the post of Tax Assistant or Clerk-Typist, having not less than three years regular service in that post ; and

(*ii*) who has passed Departmental Examination prescribed for Tax Assistant or Clerk-Typist as the case may be ; and

(*iii*) who has passed Part-I Departmental Examination prescribed for State Tax Inspector in the Goods and Services Tax Department ; or

(*b*) by selection on the basis of merit list prepared by the Commission on the basis of result of the Departmental Competitive Examination conducted in accordance with the orders issued in that behalf from time to time,

or

(*c*) by nomination from amongst the candidates who—

(*i*) are not less than nineteen years of age and not more than thirty eight years of age :

Provided that, the upper age limit may be relaxed up to five years in case of the candidates belonging to backward classes ;

Provided further that, the upper age limit may be relaxed up to five years in respect of those candidates who are already in the Government Service; and

(*ii*) Possesses a degree.

**4.** Appointments to the post by promotion, selection and nomination shall be made in the ratio of 40 (37% from Tax Assistant Cadre and 3% from Clerk-Typist Cadre) : 10:50

Provided that, with prior approval of Government, the appointing authority may relax the ratio of appointment by promotion, selection and nomination. Provided that, the appointment by selection shall be done by promotion in case of non availability of eligible persons for selection process.

**5.** The person appointed by nomination for the post mentioned in rule 3, shall be on probation for a period of two years. The probation period can be extended up to 1 year. If the probation period is not completed satisfactorily then such person shall be liable for termination from service.

**6.** The person appointed by nomination mentioned in rule 3, shall be required to execute the bonds, prescribed by the Government. If the candidate resigns from the post of State tax Inspector or relieved from the Goods and Services Tax Department, before the expiry of the probation period, one month of basic pay of concerned employee shall be recovered from such candidate.

**7.** The person appointed by nomination mentioned in rule 3, has to pass the Departmental Examination as per Rule 4 (a) of Unified Post Recruitment Ministerial Sales Tax Department examinations Rules, 1972, within 3 years or in 3 attempts, whichever is earlier, if said person has not earlier passed the said examination within the prescribed time limit or exempted from passing said examination.

**8.** The person appointed by nomination mentioned in rule 3, shall be required to pass the Examination of Hindi and Marathi language according to the rules made in this behalf, unless he has already passed or has been exempted from passing those examinations.

**9.** The person appointed by nomination mentioned in rule 3, shall possess Certificate in Computer Operation as prescribed by the Directorate of Information and Technology, Government of Maharashtra, from time to time.

**10.** The person appointed by nomination mentioned in rule 3, shall undergo such Training as may be specified by the Government.

**11.** The person appointed on the post mentioned in rule 3, shall be liable for transfer anywhere in the State of Maharashtra.

By order and in the name of the Governor of Maharashtra,

VIJAY D. SHINDE,

Deputy Secretary to Government.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATIONS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004. EDITOR : DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE.